# Tex-Connect

महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाचा एक पुढाकार



## या अंकात


| | |
|---|---|
| बाजाराचे अंतरंग | पृष्ठ २ |
| लक्ष केंद्रित केलेले विभाग | पृष्ठ ३-४ |
| घटना व घोषणा | पृष्ठ ५-६ |




“ आमच्या त्रैमासिक वृत्तपत्रिकेच्या पहिल्या अंकास सकारात्मक व हृदयस्पर्शी प्रतिसाद मिळाल्याने मला आनंद होत आहे. टेक्स-कनेक्ट हे आमच्या चैतन्यशील वस्त्रोद्योग क्षेत्रातील अदयतने, नवकल्पना आणी घडामोडी सामायिक करण्यासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ आहे.


वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी पारंपारिक वस्त्रोद्योग हा केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे तर संपूर्ण भारतासाठी महत्वाचा राहिला आहे. या उद्योगात अगदी वैदिक काळापासून शतकानुशतके चालत आलेल्या कला आणी परंपरेचा वारसा या उद्योगाने जतन केलेला आहे आणि पुढे चालवलेला आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ - २०२८ यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आमच्या पारंपारिक विणकरांना आधार देणे, पाठिंबा देणे व सक्षम करणे व असा सामाजिक आधार देणे की ज्याद्वारे ते आपला वारसा पुढे चालू ठेवतील यावर आमचे सदर धोरण केंद्रित आहे. आम्ही नोव्हेंबर महिन्यात सीआयआय च्या सहकार्याने आयोजित केलेल्या Tex-Future 2023 - ‘Envisioning a Thriving future for the Textile & Apparels Industry’ या गुंतवणूकदारांच्या परिषदेला प्रचंड प्रतिसाद मिळाला हे घोषित करताना मला खूप आनंद होत आहे. या परिषदेत वस्त्रोद्योग क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, संशोधन व विकास क्षेत्र, कौशल्यवर्धन व ई-कॉमर्स या मध्ये ४१ सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. रु. ५५०० कोटीची गुंतवणूक करण्याची कटिबध्दता झाली. ही परिषद म्हणजे स्वारस्य धारकांच्या व भागधारकांसाठी उज्ज्वल भवितव्यासाठी कल्पना करणे व त्यासाठी भागिदारी निर्माण करणे यासाठी एक आदर्श मंच होता.

**माननीय श्री चंद्रकांत (दादा) पाटील**
**वस्त्रोद्योग मंत्री**
**महाराष्ट्र राज्य**

# बाजाराचे अंतरंग: हातमाग आणि पारंपरिक वस्त्रोद्योग


## दृष्टीक्षेप

आपल्या देशाच्या इतिहासात पारंपारिक वस्त्रोद्योगाने अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे व हा वस्त्रोद्योग अत्यंत चांगल्यारीतीने जपलेल्या परंपरांपैकी एक आहे. सुरुवातीला पारंपरिक हातमागावर परंपरागत वस्त्रे विणली जात होती. तथापी आता वस्त्रांच्या डिझाईनचे नमुने व लकबी (स्टाईल) यांची वाढत्या प्रमाणात यंत्रमागावर नक्कल तयार केली जात आहे. खालील आलेखामधून असे दिसून येते की वस्त्रोद्योग मंत्रालय भारत सरकार हातमाग क्षेत्रातील उत्पादन व निर्यात वाढवायचा प्रयत्न करीत आहे.





**हातमाग क्षेत्रातील अद्यतन व लक्षीत उत्पादन क्षमता व निर्यात क्षमता**

हातमाग क्षेत्रामध्ये सध्या २३.७७ लक्ष हातमाग वापरले जातात. त्यावर काम करणारे कामगार मोठ्या प्रमाणात ग्रामीण व निमशहरी क्षेत्रातील आहेत. त्यावर काम करणाऱ्या विणकर कामगारांपैकी बहुतेक महिला आहेत. खाली दिलेल्या आलेखातून असे दिसते की ७१% विणकर महिला आहेत.




**भारतामध्ये विणकरांची लिंगावर आधारित टक्केवारी**

भारतामधील पारंपारिक हातमाग क्षेत्र व वस्त्रोद्योग क्षेत्र हे लघू उद्योगात असंघटीत असे आहे. त्यामधे तंत्रज्ञानाची स्वीकृती फार कमी आहे. जगातील एकूण शटल विरहीत (आधूनिक) मागांमध्ये भारताचा हिस्सा केवळ २% आहे. एकूण मागांपैकी ८५% माग महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान मध्ये आहेत. असंघटित वस्त्रोद्योग क्षेत्र ज्यामध्ये केवळ हातमागच नव्हे तर होजिअरी, गारमेंटिग, निटींग, सूत व कापड यावर प्रक्रिया करणे यांचा समावेश आहे. या क्षेत्रामधे शेतीच्या खालोखाल मनुष्य बळाचा वापर होतो. ही क्षेत्रे (शेती व वस्त्र) जास्तीत जास्त कामगार बळ शोषून घेते. खाली दिलेल्या नकाशामधून असे दिसून येते की अमेरीका व युरोपीयन देश हे २०२१-२२ साठी भारताच्या हातमाग उत्पादनांचे प्रमुख आयात करणारे होते.




**भारताची देशनिहाय हातमाग निर्यात**

## भारत सरकारने घेतलेला पुढकार


भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने दरवर्षी राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रमासाठी निधीची तरतूद केली आहे. त्यामध्ये अनेक घटकांचा समावेश आहे. जसे विणकरांसाठी योजना, सूत पुरवठा योजना, व्यापार सुलभता केंद्रे आणी समूह विकास कार्यक्रम. या सर्वांसाठी २०२३-२०२४ मधे २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती तर २०२२-२०२३ साठी सुधारलेल्या अंदाजानुसार उत्पन्न रु.१५६ कोटी होते.

मेक इन इंडिया, कौशल्य भारत, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण युवा रोजगार यासारखे सरकारी उपक्रम या क्षेत्रात अत्यंत आवश्यक चालना आणि सर्वसमावेशकता प्रदान करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळामध्ये या क्षेत्राला ज्या आव्हानांना सामोरे जावे लागते त्याला प्रतिक्रिया म्हणून मंत्रालयाने हातमाग विणकर, कारागीर व उत्पादक यांना शासकीय ई-मार्केटप्लेसमध्ये समाविष्ट करुन घेतले. तसेच मंत्रालयाने हातमाग उत्पादनाचे विपणन करण्यासाठी २३ ई-कॉमर्स संघटनांना हे काम दिले आहे.

# लक्ष केंद्रित केलेले क्षेत्र: महाराष्ट्रातील पारंपरिक वस्त्रोद्योग

## महाराष्ट्रातील पाच वस्त्रोद्योग रत्ने

महाराष्ट्राला पारंपरिक वस्त्रोद्योगाचा वैविध्यपूर्ण इतिहास आहे. त्यातून राज्याची सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक परंपरा दिसून येते. विणकर हे या उपक्षेत्राचा कणा आहेत. त्यांनी या कलेला उपजतच वाहून घेतलेले आहे व त्यांची तळमळ, त्यांची निष्ठा ही मागापलीकडे स्थानिक समाजासाठी ही आहे. हे क्षेत्र विणकरांना रोजगार पुरवते. त्यामध्ये पिढ्यांपिढ्या मधून समृध्द परंपरेने हस्तांतरण होते व कौशल्याचे ही हस्तांतरण करते. महाराष्ट्रातील पाच मुख्य वस्त्रोद्योग परंपरामध्ये घोंगडी, पैठणी साडी, हिमरु, करवत काठी व खण वस्त्र यांचा समावेश होतो.




**महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योगाचे पाच महत्वाचे घटक राज्याच्या संपूर्ण भौगोलिक क्षेत्रात पसरले आहेत.**

घोंगडी हे लोकरीचे ब्लँकेट असते. ते प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राच्या शेळ्या, मेंढ्या पाळणाऱ्या समाजाने तयार केलेले असते. त्यांना धनगर म्हणतात. हे धनगर या घोंगड्या पिटलूमवर नैसर्गिक रंग व चिंचेची पेस्ट वापरुन तयार करतात. घोंगडी ही उबदार असते, खूप टिकते व त्यामुळे ॲक्यूप्रेशरचे फायदे मिळतात.

पैठणी हे इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून पैठण विभागात रेशीम व जरीने हाती विणलेले वस्त्र आहे. ते लालित्यपूर्ण जटिल आकृतीबंधात तयार केलेल असते व त्यामध्ये विविध नमुने तयार करण्यासाठी इंटरलॉक व टेपस्ट्री हे तंत्र वापरले जाते. अनेक वर्षापासून पैठणी ही प्रतिष्ठेची निर्देशक झाली आहे. ती खास समारंभात नेसली जाते.

हिमरु हे वस्त्र कापूस, रेयॉन व रेशीम यांच्या धाग्याचे मिश्रण करुन विणलेले वस्त्र असते. त्यामध्ये विविध तऱ्हेची पूर्ण डिझाईन असतात, जसे भूमिती मधील आकार, समांतर रेषा व वनस्पती आणि प्राणी हे वस्त्र इसवी सनाच्या १४व्या शतकात बनवले आहे. हिमरु चा उपयोग कपडे, घरगुती कपडे व फॅशनेबल कपडे बनविण्यासाठी होतो.



**डावीकडून उजवीकडे: घोंगडी, पैठणी, हिमरू, करवत काठी आणि खण कापड**

करवत काठी साडी ही महाराष्ट्रातील विदर्भ विभागातून उगम पावते. या साडीचा काठ करवतीसारखा असतो व तो वैशिष्ट्यपूर्ण एकमेव असा असतो. हे वस्त्र पिटलूमवर कापडाचे थ्री फ्लाय शटल्स व टसर रेशीम यांनी बनविले जाते. अभिलेखांमधून असे दिसते की हे वस्त्र इसवी सन १७व्या शतकातील आहे. हे कापड तयार झाले की ते लाकडाच्या ठोकळ्यावर लहान लाकडी हातोड्याने ठोकले जाते व त्यामुळे त्या कापडावर समान फिनीश येतो.

खण हे कापूस व व्हिस्कॉस सिल्क या पासून विणलेले कापड आहे. हे महाराष्ट्र व कर्नाटक मध्ये परंपरागतरीत्या साडीवर वापरण्याच्या चोळीसाठी (ब्लाऊज) साठी वापरली जाते. खण हे त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण टूटोन हनिकाँब ब्राँकेड पॅटर्न साठी प्रसिध्द आहे. हा पॅटर्न काठाच्या विरुध्द प्रकारचा असतो. लोकप्रिय कलाकृतीमध्ये नक्षीकाम, खगोलशास्त्र लोककला व हिंदू पुराण यांचा समावेश होतो.

पारंपरिक वस्त्रोद्योग व त्यांचे विणकर यांना यांत्रिकीकरणामूळे व्यवसायाचे प्रमाण व कार्यक्षमता यांच्या बाबतीत धोका दिसतो. परंतू त्याचवेळी ग्राहक जागरुरीत्या खात्रीपूर्ण कपडे खरेदी करतात व पारंपरिक कलाकार समाजाला पाठिंबा व आधार देतात असे दिसून येते.

# केंद्रस्थानी असलेले क्षेत्र: हातमाग आणि पारंपरिक वस्त्रोद्योग

## विणकर प्रोफाइल: शतकानुशतकांचा वारसा असलेल्या हस्तकलेची एक झलक

महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योगाच्या वारशाच्या केंद्रस्थानी, श्री. मदनलाल प्रभाकर ढलकारी यांच्यासारख्या कुशल कारागिरांच्या हातांनी परंपरेचे नक्षीदार कापड विणले जात आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण या ऐतिहासिक शहराचे रहिवासी असलेले श्री. ढलकारी हे एक कुशल विणकर आहेत, ज्यांच्या कुटुंबाने रेशमी पैठणी विणकरांच्या तीन पिढ्यांचा कौटुंबिक वारसा जतन केला आहे.



**श्री. ढलकारी यांना त्यांच्या हस्तकलेतील कौशल्याबद्दल सन्मानित केले जात आहे**

पैठणी, ही एक काळाने सन्मानीत केलेली हाताने विणलेली रेशीम साडी महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग परंपरेचे शिखर आहे. मोर, हत्ती, पक्षी, फुले आणि पाने यासारख्या जटील आकृतींनी सुशोभित केलेल्या भव्य जरी (सोन्याचा धागा) आणि पदर (बारकाईने तयार केलेला काठ) हे त्याचे वैशिष्ट्य आहे. एक उत्कृष्ट कापड असण्यापलीकडे पैठणीला सांस्कृतिक महत्त्व आहे, जे महाराष्ट्रीयन विवाहसोहळे आणि उत्सवांमध्ये खोलवर रुजलेले आहे. एक पैठणी साडी तयार करणे हे केवळ श्रमाच्या पलीकडे जाते; ते संयम आणि समर्पणाच्या कलेचा तो पुरावा आहे. पैठणी बनवायला आठवडे, महिने आणि कधीकधी अगदी वर्षेही लागतात.

पैठणी वीणकामाच्या समृद्ध इतिहासाशी आणि कलात्मकतेशी असलेला सखोल संबंध श्री. ढलकारी यांना दररोज प्रेरित करतो. त्याच्या कुटुंबाच्या परंपरेची जपणूक करण्याची इच्छा त्याच्या समर्पणाला चालना देते. पैठणी विणकामाप्रती ढलकारी कुटुंबाची बांधिलकी राष्ट्रीय आणि राज्य अशा दोन्ही पातळीवर मान्य करण्यात आली आहे. श्री मदनलाल ढलकारी यांचे वडील श्री. प्रभाकर अंबादास ढलकारी यांना 'बंगडी मोर पैठणी' साडीवरील त्यांच्या अपवादात्मक कार्यासाठी १९९३ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती श्री शंकर दयाल शर्मा यांनी प्रतिष्ठित 'राष्ट्रपती पुरस्कार' देऊन सन्मानित केले.



**श्री. ढलकारी अनेक दशकांपासून या हस्तकलेला प्रोत्साहन देत आले आहेत**

श्री. मदनलाल ढलकारी आणि त्यांचे थोरले पुत्र श्री. राकेश मदनलाल ढलकारी यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत आणि त्यांचे धाकटे सुपुत्र श्री. रोशन मदनलाल ढलकारी यांना जिल्हा स्तरावर सन्मानित करण्यात आले आहे. भविष्याचा वेध घेताना, श्री. ढलकारी हे रचना आणि नवकल्पनांद्वारे पैठणी साडी हातमागाची परंपरा जतन आणि पुढे नेण्याची कल्पना करतात. त्यांची चिरस्थायी भावना शतकानुशतके महाराष्ट्राचा वस्त्रोद्योग वारसा टिकवून ठेवणाऱ्या कारागिरीचा जिवंत पुरावा आहे.

### धोरणामधून

या धोरणामध्ये पैठणी, हिमरु, करवत काठी, खण व घोंगडी कपड्यांना पारंपरिक कपडे म्हणून ओळखले जाते. या धोरणानुसार दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दिवशी पुरुष व महिला विणकरांना उत्सव भत्ता दिला जाईल. राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त या पाच कपड्यांच्या सर्वोत्तम डिझाईनना बक्षीस दिले जाईल. ६० वर्षापेक्षा जास्त वयाच्या विणकरांना वृद्धापकाळ निवृत्ती वेतन देण्याचे धोरण ठरविले. प्रमाणित पारंपारिक विणकरांना कौशल्य विकास योजनेअंतर्गत मास्टर ट्रेनर म्हणून नोंदणी करावी यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

# कार्यक्रम

## टेक्सफ्यूचर २०२३ गुंतवणूकदार परिषद

महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने सीआयआय यांच्या सहकार्याने ०१ नोव्हेंबर २०२३ रोजी मुंबई येथे टेक्सफ्यूचर २०२३ ही गुंतवणूकदार परिषद आयोजित केली. या परिषदेला भारत सरकार, महाराष्ट्र शासन यांच्या महत्वाच्या व्यक्ती व वस्त्रोद्योग क्षेत्रातील महत्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या.




**टेक्सफ्युचर 2023 या परिषदेच्या उद्घाटनासाठी उपस्थित महनीय व्यक्ती.**

उद्घाटनाच्या सत्रामधे वस्त्रोद्योग क्षेत्रामधील 33 उद्योग सदस्यांबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या गेल्या व रु.५,५०० कोटी गुंतवणूकीची कटीबध्दता निर्माण झाली. तसेच ३ शैक्षणिक संस्थांबरोबर वस्त्रोदयोग व तांत्रिक वस्त्रोदयोगातील क्षमताबांधणी, संशोधन व विकास यांना बळकटी देण्यासाठी सामंजस्य करार केले. भारत सरकारच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन टेक्निकल टेक्सटाईल साठीच्या दोन संस्थांबरोबर तपासणी, संशोधन व नाविन्यता यासाठी सामंजस्य करार केले. तसेच राज्यातील वस्त्रोद्योग उत्पादनांचे विपणन करण्यासाठी मंच उपलब्ध होण्यासाठी दोन ई-कॉमर्स संस्था बरोबर सामंजस्य करार करण्यात आले.

टेक्सफ्युचर २०२३ या परिषदेदरम्यान स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारांमुळे महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग क्षेत्राच्या धोरणांची अंमलबजावणी आणि गुंतवणूक आणणे याचा पथदर्शक नकाशा तयार झाला आहे. शैक्षणिक संस्थांबरोबर स्वाक्षरी झालेल्या सामंजस्य करारामध्ये आय.आय.टी. मुंबई, डि.के.टी.ई., टेक्सटाईल ॲण्ड इंजिनियरींग इन्स्टिट्यूट आणि वीरमाता जिजाबाई इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे.



**भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या.**



**डीकेटीई टेक्सटाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या.**



**वीरमाता जिजाबाई इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या.**

महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे बरोबर सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. भारत सरकारचा सेंटर ऑफ एक्सलन्सबरोबर स्वाक्षऱ्या केलेल्या सामंजस्य करारामध्ये बॉम्बे टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन आणि सिंथेटिक आर्ट मिल्स रिसर्च असोसिएशन यांच्या बरोबरच्या सामंजस्य कराराचा समावेश आहे.

# कार्यक्रम

## टेक्सफ्यूचर २०२३ गुंतवणूकदार परिषद (पुढे चालू)



**बॉम्बे टेक्सटाईल रिसर्च असोशिएशन यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या.**



**लोकल नेशन यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या.**



**सिंथेटीक आर्ट मिल्स रिसर्च असोशिएशन यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या.**

ई-कॉमर्स संस्थांबरोबर स्वाक्षऱ्या केलेल्या सामंजस्य करारामध्ये महाराष्ट्र शासन आणि ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्स यांचा समावेश आहे.



**ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्स यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या.**

तसेच वस्त्रोद्योग विभाग आणि लोकल नेशन यांचेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या.

या समारंभात एक वैचारिक नेतृत्वाचा अहवाल “डिकेडल आऊटलूक फॉर टेक्सटाईल इंडस्ट्री” यांचे प्रकाशन झाले. त्याचबरोबर विभागाचे नवे बोधचिन्ह (लोगो) व अधिकृत व्हिडीओ यांचे विमोचन सन्माननीय अतिथींच्या हस्ते करण्यात आले.




**थॉट लीडरशीप रिपोर्टचे विमोचन झाले.**

उद्घाटनाच्या सत्रानंतर धोरणामध्ये नमूद केलेल्या मुद्द्यांवर पॅनल चर्चा झाली. त्यामध्ये वस्त्रोद्योग क्षेत्रातील तसेच इतर क्षेत्रातील व उपक्षेत्रातील वक्त्यांनी भाग घेतला.




**विविध वक्त्यांनी पॅनेल चर्चेमध्ये भाग घेतला.**

# कार्यक्रम

## टेक्सफ्यूचर २०२३ गुंतवणूकदार परिषद (पुढे चालू)

पहिल पॅनेल चर्चा “तांत्रिक वस्त्रोद्योग आणि त्याची महाराष्ट्रातील संभाव्यता” या विषयावर चर्चा झाली. दुसरी पॅनल चर्चा “वस्त्रोद्योग क्षेत्रात चालू राहण्यासाठी पर्यायी व उदयोन्मुख तंत्राचा वापर व त्याचवेळी भविष्यातील कौशल्याचा वापर करण्याची तयारी” या विषयावर झाली. तिसरी पॅनल चर्चा “ जागतिक वस्त्रोद्योग बाजारपेठेमध्ये मोठी संधी उपलब्ध होण्यासाठी ग्राहकांच्या पसंतीवर परिणाम करण्यामध्ये ई-कॉमर्स व किरकोळ विक्री यांची भूमिका” या विषयावर झाली.



**आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालयातील कर्मचारी आणि वस्त्रोद्योग विभागाचे प्रशासकीय कर्मचारी हे या समारंभास उपस्थित होते.**



**माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी उद्योगांशी संवाद साधला**

या समारंभात श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, माननीय मंत्री, वस्त्रोद्योग व उद्योगातील ज्या सदस्यांनी गुंतवणूक कटीबध्दतेवर स्वाक्षऱ्या केल्या त्यांच्यामधे नव्याने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरणाबाबत चर्चा झाली. उद्योगाच्या सदस्यांनी धोरण व त्यांची अंमलबजावणी यावरील आपले विचार सामाईक केले. ते अंतरंगदर्शी व भविष्यदर्शी होते.

## प्रादेशिक उपायुक्त यांच्या कार्यशाळा

वस्त्रोद्योग सचिव यांच्या नेतृत्वाखाली वस्त्रोद्योग विभागाने एक राज्यस्तरीय प्रशासकीय कार्यशाळा प्रादेशिक उपायुक्तांबरोबर यशदा, पुणे येथे आयोजित केली. नवीन वस्त्रोद्योग धोरणाची उद्दीष्ट्ये व ती साध्य करण्यासाठी आवश्यक कृती हा या कार्यशाळेचा हेतू होता. या कार्यशाळेमध्ये वस्त्रोद्योग सचिव यांनी धोरणातील ठळक बाबी व विभागासाठी भावी काळातील कृती यावर एक सादरीकरण केले.

यानंतर मुंबई, नागपूर, औरंगाबाद व सोलापूर येथील प्रादेशिक उपायुक्तांमध्ये वस्त्रोद्योग धोरणाबाबत गट चर्चा झाली. यामध्ये प्रादेशिक उपायुक्तांनी भविष्यातील संभाव्या आव्हाने व त्यावरील उपाय व त्यांची अंमलबजावणी यावर चर्चा केली.

## उद्योगांबरोबर केंद्रिय गटचर्चा

नव्याने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरणाबाबत उद्योगाबरोबर केंद्रीत गट चर्चा केली गेली. सचिव, वस्त्रोद्योग हे या बैठकीचे अध्यक्ष होते.



**सचिव, वस्त्रोद्योग यांनी धोरणाचा सारांश मांडला.**

# घोषणा

## वस्त्रोद्योग विभागाचे बोधचिन्ह व अधिकृत व्हिडीओ याचे विमोचन

टेक्स फ्युचर गुंतवणूकदार परिषदेमध्ये वस्त्रोद्योग विभागाने आपले बोधचिन्ह जाहीर केले. हे बोधचिन्ह वस्त्रोद्योग विभागाचे प्रतिक आहे. त्यामध्ये मोराच्या आकाराची एक स्पिंडल मध्यभागी ठेवली आहे.

वीण समृद्धीची

**नव्याने जाहीर केलेले वस्त्रोद्योग विभागाचे बोधचिन्ह.**

यामध्ये मोर हा शक्ती आणि सामर्थ्य याचे प्रतिनिधीत्व करतो. तसेच तो संपत्ती व संपन्नता यांचे प्रतिनिधीत्व करतो. महाराष्ट्रामध्ये "मोर" हा प्रत्यक्ष पैठणी साडीमध्ये विणण्यासाठी अत्यंत लोकप्रिय आहे. या मोराच्या सभोवती एक औद्योगिक चक्र आहे. या चक्रामध्ये मोरपिसे आहेत. ते मोराचा चैतन्यशील शोभिवंत प्रतिमेचे प्रतिनिधीत्व करतात. मोरपिसे ही अमरत्व व दूष्ट शक्तींपासून संरक्षण यांचे प्रतिनिधीत्व करतात. बोधचिन्हाच्या तळाला विभागाचे बोधवाक्य मराठी मध्ये लिहीले आहे. त्याचा अर्थ "वीण समृध्दीची" असा होतो.

विभागाच्या अधिकृत व्हिडीओचे विमोचन करण्यात आले. जो विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**संपर्क साधा**

श्रीकृष्ण बाबुराव पवार, उपसचिव (वस्त्रोद्योग)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (स. प. व व. वि.)
महाराष्ट्र शासन

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांकाचा: ०२२-२२०२५१५९
ईमेल: shrikrishna.pawar@nic.in

## वस्त्रोद्योग विभागाच्या संकेतस्थळाचे विमोचन

वस्त्रोद्योग विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाची पुर्नरचना करुन अदययावत संकेतस्थळाचे विमोचन (सुरुवात) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, माननीय मंत्री, वस्त्रोद्योग यांच्या हस्ते झाले.



**वस्त्रोद्योग सचिव व एन.आय.सी.चे एस.आय.ओ. यांनी माननीय वस्त्रोद्योग मंत्री यांच्या उपस्थितीत संकेत स्थळाचे उद्घाटन केले.**

## महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले शासन निर्णय

या धोरणाअंतर्गत वस्त्रोद्योग विभागाने ५ शासन निर्णय निर्गमीत केले आहेत.

1. गणेश चतुर्थीला पाच पारंपरिक वस्त्र विभागातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता योजना.
2. हातमाग विणकरांना प्रत्येक महिन्याला २०० युनिट वीज बील मोफत योजना.
3. पारंपरिक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षीस योजना.
4. कच्चा माल पुरवठा योजनेमध्ये राज्य सरकारचा हिस्सा
5. राज्यातील प्रत्येक अंत्योदय शिधा पत्रिका धारक कुटुंबाला दरवर्षी एक साडी मोफत पुरविणेची कॅप्टिव्ह मार्केट योजना.

हे सर्व शासन निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

अस्वीकरण: नियतकालिकात दिलेल्या माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता यांची खात्री करण्यासाठी सर्व प्रयत्न केले असले तरी, त्याची पूर्णता किंवा समयोचितता याची हमी दिली जाऊ शकत नाही. दिलेल्या आशयाचा हेतु हा केवळ सर्वसाधारण माहिती देण्याचा आहे आणि तो कायदेशीर, आर्थिक किंवा व्यावसायिक सल्ला म्हणून विचारात घेण्यात येऊ नये. पुरविण्यात आलेला आशय हा माहितीच्या प्रयोजनसाठी आहे आणि स्पष्टपणे निर्देशिल्याशिवाय कोणतेही विशिष्ट उत्पादन, सेवा किंवा संस्थेचे समर्थन किंवा प्रचार म्हणून याचा अन्वयार्थ लावण्यात येऊ नये. या नियतकालिकात बाह्य संकेतस्थळ, दस्तऐवज किंवा संसाधनांचे दुवे (हायपरलिंक) किंवा संदर्भ यांचा समावेश असू शकतो. आशय, अचूकता किंवा बाह्य स्रोतांची उपलब्धता या बाबींवर विभागाचे नियंत्रण नाही.